**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०५ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट क्र.१४, प्रेमप्रभा, वीरभद्रनगर, गणराज मंगल कार्यालयाजवळ, बाणेर, पुणे-४५ |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्यसेवा मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सह संचालक, आरोग्यसेवा मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ |

अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारात माहिती मागितली नसल्याने माहिती देण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे चुकीचे आहे. सहसंचालक, आरोग्य सेवा कार्यालयाने उपसंचालक आरोग्यसेवा कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारात माहिती देण्याचे पत्र आहे. या प्रकरणात अपीलकर्त्याने सादर केलेली वेगवेगळी निवेदने विचारात घेण्यात येत आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी तातडीने अर्जदारास माहिती पुरवावी व सदरचे पत्र प्राप्त होताच १५ दिवसांचे आत पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. १.४.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि.५.४.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:पुणे / ५०७** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.अरविंद इराप्पा बगतगिरी<br>प्लॉट नं.९, यशोधन अपार्टमेंट, चैत्रबन सोसायटी,<br>सांगवी, पुणे-२७ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहाय्यक अभियंता, (भूमी जिंदगी) पुणे महानगरपालिका,<br>शिवाजीनगर, पुणे-४११००५ |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :उपआयुक्त (विभागीय कार्या.क्र.१),<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५ |

अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्ता यांना माहिती दिली आहे असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कागदपत्रांसह निवेदन केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००८ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०८ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेश भिवाजी कांबळे<br>संध्यानगरी, ई-५, कृपा बंगला, विशालनगर,<br>जगताप डेअरी, पुणे-२७ |
| ३ | जन माहिती अधिकारी | मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,<br>पुणे-४११ ००१ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,<br>आगरकरनगर, पुणे-१ |

अपीलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकाऱ्यांनी यापूर्वीच माहिती दिलेली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १.४.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:५१ व ५२/सांगली/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.वसंत महादेव शिंदे<br>मु.पो.शेगाव, ता.जत, जि.सांगली |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता अपीलकर्त्यास द्यावयाची राहिलेली माहिती, शिपाई श्री.मदने यांच्या संदर्भातील मान्यता प्रस्तावाची प्रत शाळेकडून प्राप्त करुन देण्याचे जन माहिती अधिकाऱ्याने मान्य केलेले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) ऊर्वरित माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी पूर्तता अहवाल आयोगास दि.५.५.३००८ पर्यंत सादर करावा.

**पुणे**
**दि. २५.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१० / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिनेश भगवान हंचाटे<br>बी-२/१०, विद्यानगरी, बारामती, ता.बारामती, जि. पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक ग्रंथालय संचालक, पुणे विभाग, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | ग्रंथालय उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई |

अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्याला ग्रंथालयात पुनर्नियुक्ती देण्याची मूळ मागणी आहे. हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१२ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. गिरीष रघुनाथ वाघ<br>औंध उरो व सर्वसाधारण रुग्णालय कामगार वसाहत,<br>जुनी चाळ, पुणे-२७ |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहसंचालक (हिवताप व हत्तीरोग ) आरोग्यसेवा, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, पुणे-१६ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य प्रशासकीय अधिकारी (संचालक) आरोग्यसेवा संचालनालय, शासकीय दंतालय इमारत, चवथा मजला, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, मुंबई -१ |

अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्यास माहिती दिली असूनही वारंवार तीच माहिती मागून त्रास देत असल्याचे निवेदन जन माहिती अधिकाऱ्यांनी केले. तसेच दारू पिऊन कार्यालयात अयोग्य वर्तन केल्याबद्दल अपीलकर्त्याविरूध्द पोलीसांत तक्रार केली असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २.४.२००८**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुंक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:५३/सांगली/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.बंडोपंत मायाप्पा ठेंबरे<br>राजोबाची वाडी, पो.गाडब्याळ, ता.जत, जि.सांगली |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

अपीलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपीलकर्त्यास माहिती दिलेली असल्याचे कागदपत्रांवरुन आढळून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:५४ / कोल्हापूर /२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.श्रीकांत श्रीपती पाटील<br>मु.पो.मौजे सांगाव, ता.कागल, जिल्हा कोल्हापूर |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :गटविकास अधिकारी, पंचायत समिती कागल,<br>जिल्हा कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर |

अपीलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती वेळेत दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२४.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:५४/सांगली/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.बाबासाहेब शंकर सोलनकर<br>मु.पो.सलगरे, ता.मिरज, जि.सांगली |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नसल्याचे निष्पन्न झाले. वि.मान जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली यांनी आवश्यक ती माहिती दि.१५.४.२००८ पर्यंत देण्याचे मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.
(२) जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.२५.४.२००८**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. बाबासाहेब शंकर सोलनकर<br>मु. पो. सलगरे, ता. मिरज, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

उभय बाजूंमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता माहितीबाबत एकमत झाले. माहिती मिळाली आहे, असे उभय बाजूंनी मान्य केले. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२४.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

५।५।०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणें खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:५८/कोल्हापूर/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.सुनिल बापूसो आंबी<br>मु.पो.उदगांव (साखळे मळा), ता.शिरोळ,<br>जिल्हा कोल्हापूर-४१६१३४ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे-५ |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोले रस्ता, पुणे-५ |

राहिलेल्या कागदपत्रांच्या प्रती मिळाव्या व तद्नंतर सुनावणी घ्यावी अशी अपीलकर्त्याची मागणी आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याला द्यावयाच्या राहिलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी १५ दिवसात निःशुल्क द्याव्यात व त्याचा पूर्तता अहवाल आयोगाकडे सादर करावा.

**पुणे**
**दि.२८.४.२००८**

(स्टॅम्प: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
मुस्ती शिक्षण प्रसारक मंडळ, मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३ / सोलापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर श्री.अे.एम.अंबाळकर

**जन माहिती अधिकारी** तथा शासकिय माहिती अधिकारी,
मुस्ती शिक्षण प्रसारक मंडळ, मुस्ती,
ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.अशोक अण्णाराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.७.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मुस्ती शिक्षण प्रसारक मंडळ, मुस्ती ता.दक्षिण सोलापूर या संस्थेची घटनेची प्रमाणित सुस्पष्ट प्रत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे यांनी मुस्ती शिक्षण प्रसारक मंडळ, मुस्ती या संस्थेच्या घटनेची प्रत जन माहिती अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी, मुस्ती शिक्षण प्रसारक मंडळ, मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर यांच्याकडे माहितीच्या अधिकारात मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून ती न मिळाल्यामुळे श्री.मोरडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्याकडे अपील केले. श्री.मोरडे यांनी आवश्यक ते शुल्क भरुन संबंधित माहिती प्राप्त करुन घ्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी श्री.ए.एम.अंबाळकर यांनी दिला. माहिती मागितली तेव्हा घटनेची प्रत देण्याबाबत असलेल्या तांत्रिक अडचणी जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मुस्ती शिक्षण प्रसारक मंडळ, मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर यांनी स्पष्ट केल्या व त्याचवेळी संबंधित प्रत श्री.मोरडे यांना दिली. आपल्याला माहिती मिळाली असून आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही असे निवेदन श्री.मोरडे यांनी दि.३१.१.२००८ रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ८.४.२००८
ऑगस्ट-०८-४०-४१

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव रामभाऊ थोरात
मु. पो. निमगाव, ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, खेड ता. खेड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
निवासी नायब तहसीलदार खेड,
ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४४ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | ११.९.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | ९.१०.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ३.११.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्यांने निर्णय दिल्याची तारीख | १२.१२.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे निमगाव येथील जमीन गट क्र. ३०४ व ३११ चे पुनर्वसनाच्या संपादनाकामी त्या मूळ गटातील सहहिस्सेदारांच्या पूर्वीपासून वहिवाटीचा तहसीलदार यांच्याकरवी दि. ९.१२.२००५ रोजी करणेत आलेल्या पंचानाम्याची प्रत | |

## विवेचन

मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ प्रमाणे खटला क्रमांक तखअ/एस.आर./२२/०५ चे कामी तहसीलदार, खेड यांनी दि. ९.१२.२००५ रोजी जमीन गट क्र. ३०४ व ३११ मौजे निमगाव, ता.

खेड, जि. पुणे येथे प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली. त्या वस्तुस्थितीदर्शक पंचनाम्याची नक्कल अपीलकर्ता श्री. बाबुराव रामभाऊ थोरात यांनी मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खेड, जि. पुणे यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने श्री. थोरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड (पुणे) यांचे दि. २८.२.२००८ चे आदेशानुसार तहसीलदार, खेड यांना मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ अंतर्गत सखोल फेर चौकशीने योग्य तो निर्णय घेण्याचे निदेश देण्यात आले आहेत. यास्तव सदर अपील रद्द करण्याची विनंती श्री. थोरात यांनी दि. १५.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.४.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव रामभाऊ थोरात
मु. पो. निमगाव, ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
तहसीलदार, खेड ता. खेड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
निवासी नायब तहसीलदार खेड,
ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४४ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | ११.९.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | ९.१०.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ३.११.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्यांने निर्णय दिल्याची तारीख | १२.१२.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे निमगाव येथील जमीन गट क्र. ३०४ व ३११ चे पुनर्वसनाच्या संपादनाकामी त्या मूळ गटातील सहहिस्सेदारांच्या पूर्वीपासून वहिवाटीचा तहसीलदार यांच्याकरवी दि. ९.१२.२००५ रोजी करणेत आलेल्या पंचानाम्याची प्रत | |

## विवेचन

मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ प्रमाणे खटला क्रमांक तखअ/एस.आर./२२/०५ चे कामी तहसीलदार, खेड यांनी दि. ९.१२.२००५ रोजी जमीन गट क्र. ३०४ व ३११ मौजे निमगाव, ता.

खेड, जि. पुणे येथे प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली. त्या वस्तुस्थितीदर्शक पंचनाम्याची नक्कल अपीलकर्ता श्री. बाबुराव रामभाऊ थोरात यांनी मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खेड, जि. पुणे यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने श्री. थोरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड (पुणे) यांचे दि. २८.२.२००८ चे आदेशानुसार तहसीलदार, खेड यांना मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ अंतर्गत सखोल फेर चौकशीने योग्य तो निर्णय घेण्याचे निदेश देण्यात आले आहेत. यास्तव सदर अपील रद्द करण्याची विनंती श्री. थोरात यांनी दि. १५.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.४.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६ अ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. तुकाराम आण्णासो मशाळकर<br>मु. पो. सलगरे, ता. मिरज, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापक, बी.एस.पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सलगरे, ता. मिरज, जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली |

प्रस्तूत कार्यक्रमास अपीलकर्ता अनुपस्थित होता. त्यांच्यावतीने प्रतिनिधी उपस्थित राहिले. आवश्यक ती देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने नेली नसल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २४.४.२००८**

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ